# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २६/०९/२०२३

-

➢ **स्त्रिअत्याचार :-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | नांदगावपेठ अप ंन ३८४/२३ कलम ४९८ (अ),३४ भादवि. | २८-८-२०२२ चे १४-०० वा ते दि ७-१-२३ चे ०८-०० वा दरम्यान दा.ता.वेळ दि २६-९-२३ चे १६-५६ वा | एक महिला | १) फिर्यादी महिलेचे नातेवाईक २) फिर्यादी महिलेचे नातेवाईक ३) फिर्यादी महिलेचा नातेवाईक ४) फिर्यादी महिलेचा नातेवाईक ५) फिर्यादी महिलेचा नातेवाईक | हकिकत असा प्रकारे आहे कि यातील फि याची आरोपी क्र एक याचे सोबत प्रेम विवाह केला होता याबाबत फि याचे घरी व सासरी पण माहीती नव्हते. त्या नंतर ती सासरी राहायला गेली. तिला माहीती पडले कि तिच्या नवरा दारु पिण्याचे व्यसन आहे फि हिला १५ ते २० दिवस सासरी राहायला गेल्यावर काही दिवस चांगली वागणुक दिली त्या नंतर आरोपी क्र १ हा विनाकारण भांडण करुन व दारु च्या नशेत घरी येवुन फि ला शिविगाळ करुन मारहाण करित होता तसेच आरोपी क्र २ आणी ३ हे सुध्दा फि यांना त्रास देत होते. तिची एक महिला नातेवाईक व आरोपी क्र ५ हे घरी येवुन फि च्या पतीला भडकावीत होते व चितावनी देवुन अश्लिल शिविगाळ करुन मारहाण करित होतो .फि याचे एक महिला नातेवाईक यांनी दोन तिन वेळी फि याचे पती समोर फि याना मारहाण करुन शिवीगाळ केली. वरुन नमुद आरोपी यानी फि चा शारीरीक मानसीक छळ केला अशा फि याचें बयाण वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| | पो स्टे वलगाव अप.क्रं. 319/2023 कलम 498(अ), 504,506, IPC | घटना ता. वेळ- दि. 26/09/2023 चे पुर्वी दा ता वेळ – दि 26/09/2023 चे 17/46 वा | एक महिला | फिर्यादी महिलेचा नातेवाईक | हकिकत अशा प्रकारे आहे की मी समक्ष पोलीस स्टेशन वलगाव येथे येऊन विचारले वरुन सांगते की, मी वर नमुद पत्यावर माझी आई व वडील यांचेसोबत त्यांचे घरी राहते व मजुरीचे काम करते. माझा विवाह माझे आई वडीलांनी सामाजिक रितीरीवाजाप्रमाणे करुन दिला होता. वरुन मी माझे पतीचे घरी नांदायला गेली असता माझे पती माझेसोबत लग्णानंतर दोन महीणे चांगला वागला परंतु त्यानंतर तो माझेसोबत लहाण सहान कारणावरुन वाद करु लागला. व माझे चारित्र्यावर संशय घेऊन माझेवर पाप लावु लागला. तसेच माझ्यामागे तगादा लावु लागला की, त्याला धंद्यापाणीसाठी पैशाची आवश्यकता आहे, असे सांगुन तो नेहमी मला म्हणत असे की, तु तुझ्या आई वडीलांनकडुन माझ्या धंद्यासाठी मला पैशाची आवश्यकता असल्याने ते पैसे 1 लाख रुपये तु तुझ्या आई-वडीलांनकडुन घेउन ये परंतु माझे आई वडीलांची बेताचीच परिस्थीती असल्याने मी माझे पतीस सांगीत असे की, माझे आई वडील परीस्थीतीने गरीब असुन ते मला पैसे देऊ शकत नाही या कारणावरुन माझा पती मला नेहमी मारहाण करुन शिवीगाळ करीत असे व जर तु माहेरवरुन पैसे आणले नाहीत तर मी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | तुझ्या जिवाचे बरेवाईट करीन अशा मला नेहमी मारहाण करुन धमक्या देत असे. माझा पती विरुद्ध तो माझा मानसीक व शारीरीक छळ करीत असलेबाबत पोलीस स्टेशन वलगाव येथे तक्रार दिली होती. तेव्हा माझी तक्रार वलगाव पोलीस स्टेशनचे पोलीसांनी आम्ही पती पत्नीत आपसी समेट घडवुन आणण्यासाठी माझा तक्रार अर्ज महिला सेल, पोलीस आयुक्तालय, येथे समुपदेशनाकरीता वर्ग केला व तेथे मला माझे पतीला आपसी समेट घडुन आणनेकरीता व समुपदेशना करीता महीला सेल, पोलीस आयुक्तालय अमरावती येथे बोलाविले परंतु, तेथे आमच्यात समेट घडुन आली नाही. माझे पतीपासुन माझा पुन्हा मानसीक व शारीरीक छळ होणार याची मला खात्री असल्याने मी त्याचेसोबत नांदायला तयार नाही. माझे प्रकरण आतापर्यंत महीला सेल, पोलीस आयुक्तालय अमरावती शहर येथे चालले व माझे पतीविरुद्ध गुन्हा दाखल करणेबाबतचे पत्र पोलीस आयुक्तालय येथुन आज दि. 26/09/2023 रोजी पो. स्टे. वलगाव येथे आले वरुन पोलीसांनी मला वलगाव पोलीस स्टेशनला बोलाऊन घेतले व मी माझे पतीने माझा केलेला मानसीक व शारीरीक त्रासाबाबतचा रिपोर्ट देत आहे. तरी त्याचेवर कायदेशीर कारवाई व्हावी.हेच माझे बयाण आहे, सांगणेप्रमाणे लिहीले टंकलीखीत केले प्रिंन्ट काढुन दिली वाचुन पाहीली सांगणेप्रमाणे बरोबर लिहीले आहे. |

- **पळवुण नेणे :-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ८६४/२३ कलम ३६३ भादंवि | अमरावती | दि. २६/९/२३ चे ११.०० वा. ते ११.३५ वा. दरम्यान दा. ता. वेळ दि. २६/९/२३ चे २०.०२ वा. | एक महिला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी ही चप्पल विक्रीचे काम करते. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी ती सामान आणणे गेली व सामान घेवुन घरि आली असता घराला कुलुप दिसले शेजारच्या घरून चाबी घेतली असता त्यांनी त्यांची मुलगी बाहेर गेली असे सांगितले. बराच वेळ झाला ती घरि परत आली नाही म्हणुन तिचा शोध घेतला. घरात शिलाई मशिनवर चिठ्ठी दिसली त्यात लिहले होते आई मी चालली मला शोधु नका मी कोणाचे घरि नाही असे लिहुन ठेवले वरून शोध घेतला असता तिचा मोबाईल घरि दिसला परंतु कागदपत्रे दिसुन आली नाही बांधा सडपातळ उंची ५.१ इंच उजव्या पायावर जुण्या जखमेचे निशान अंगात लाल टॉप काळ्य रंगाचा जिन्स अशा वर्णानाचे फिर्यादीचे अल्पवयीन मुलीला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ विश्वासघात (फसवणुक) :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| | पोलीस स्टेशन गाडगेनगर् अपक्र. ११८६ /२३ कलम- ४२०,४६८, ४७१,३४ भादवी | वेलकम टी पाईंट अम | घतावेळ् दि. एप्रिल २०२२ ते १६.५.२०२३<br><br>दातावेळ् दि. २६.९.२०२३ २१.०० वा | सरतर्फे पोहेका ९५७ संतोष तिवारी वय-५४ रा तपोवन परिसर अमरावती नौकरी शहर वाहतुक शाका पश्चिम अमरावती शहर | १.विजय लालचंद त्रिकोटी वय-३९ रा. रामपुरी कँम्प अमरावती २. राहुल शेळ्के रा. अकोली रोड साईनगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकानी यातील फिर्यादी हे पोलीस हवालदार या पदावर शवाशा यअमरावती येथे तैनैतीस असुन सरकारी वाहन एम एच १२ आर टी ९५४० या वाहनावर कर्तव्य बजावत अर्जदार यांनी नमुद केले की, सांगली जिल्हा सोडुन नमुद क्रेनचा वाहनासह कोठेही प्रवास केला नसताना सदर वाहनास वेग नियमनाचे उल्लघंनाबाबत ई चालान प्राप्त होतात प्राप्त तक्रारी मध्ये नमुद क्रेचा वाहन क्र. एम ेच १४ एफ एक्स २९६२ यास अमरावती शहर व ग्रमीण हद्दीत कलम-११२ /१८३ मोवाका प्रमाणे एकुन ६ ई चालान कार्यवाही झाली होती या अनुषगाने वाहतुक विभागाच्या वरिष्ठानी सदर वाहन डिटेन करण्याबाबत आदेशीत केले मुळ क्रेचा वाहन क्र . . एम ेच १४ एफ एक्स २९६२ चे मालक श्री. के.डी . सन्नोळी रा. सांगली यांच्या तक्रारी नतरं वरिल प्रमाणे समोर आलेल्या बाबी वरुन स्पष्ट दिसुन येते की विजय लालचंद त्रिकोटी व त्याचा मित्र राहुल शेळ्के आपसात सगमत व लबाडी करुन दिल्ली येथुन चोरी गेलेला क्रेचा वाहन क्र. डी एल ८ सी ए एम ७५३४ ओळ्ख मिटविण्यासाठी त्याच्या मुळ् नोंदणी क्र. काढुन सन्नोळी याच्या गाडीचा डुप्लीकेच नंबर वापरुन वाहनाची मुळ् ओळ्ख होवु नये याकरीता सहज दिसुन येणारे इंजिन व चेसीस क्र. मिटवुन फसवणुक केली आहे .करीता विजय त्रिकोटी व राहुल शेळ्के याच्या विरुद्द कायदेसीर कार्यवाही होण्यासाठी सरतर्फे कलम- ४२०,४६८,४७१,३४ भादवी प्रमाणे फिर्याद आहे.अशा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोठाणे बडनेरा अप क्र ६९८/२०२३ कलम १४२ मपोका | अलमास गेट जुनी वस्ती बडनेरा | दि २६/०९/२०२३ चे ११.२० ते १२.१० वा दरम्यान , दाखल दि २६/०९/२०२३ चे १६.२६ वा | सरतर्फे पो.हे.का दिपक सुंदरकर ब.न.१४५६ गुन्हेशाखा अमरावती शहर | निलेश तुकाराम वानखडे वय ४० वर्षे रा अन्नाभाउ साठे नगर जुनी वस्ती बडनेरा | हकिकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हा मा.पो.उप.आ..सा.परि.१ अमरावती शहर यांचे आदेश क्र.पोउपआ/परि.-१/तडीपार/४२३/२०२२ /दि.०३.०३.२०२२ नुसार दोन वर्षाकरिता अमरावती शहर व जिल्ह्यामधुन तडीपार असतांना नमुद तडीपार इसम याने अमरावती शहरात कोणताही परवानगी आदेश न घेता मा.पो.उपआयुक्त सा. यांचे आदेशाचे आदेशांचे उल्लंघन करुन घटनास्थळावर फिरतांना मिळुन आला. वरुन सदर आरोपीचे कृत्य कलम १४२, म.पो.का प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल. |
| २ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अपक्र. ११८५ /२३ कलम- ३८४,३८५ भादवी | जिल्हा स्टेडीअम अमरावती | घतावेळ दि.१८.९.२०२३ चे १८.५५ वा दातावेळ दि.२६.९.२०२३ चे २०.३५ वा | विशवास शंकरराव जाधव वय-५४ रा. घुईखेड ता. चांदुरेल्वे जि.अमरावती | विनोद गुलदेवकर रा. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकानी यातील फिर्यादी याना आरोपी यानी फि. तुमच्या विरुध्द एका मुलीची तक्रार आहे असे म्हणुन फिर्यादिस वारवार फोन करुन त्रास दिला तसेच त्यावर फिर्यादि यांनी आरोपीस विचारले की, कोणत्या मुलीचा तक्रार आहे मला नाव सांगा त्यावर आरोपी यांनी फोन कट केला तसेच आरोपी त्याचे काम आटपुन घरी जात असताना आरोपी यांनी फिर्यादि यांनाच चालत्या गाडीवर अडवले व फिर्यादि यांना म्हणुन लागला की, मी विनोद गुलदेवकर दैनिक मतदारराचा पत्रकार आहे माझ्या कडे तुमचा बदल एका मुलीची तक्रार आहे मी पण तुमच्या सारखा सजन्न .सादा सरळ माणुस आहे. हे प्रकरण ईथेच थांबवा आपण मँनेज करु त्यावर फिर्यादी हे म्हणाले की, मला आधी मुलीचे नाव सांगा असे म्हटल्यावर त्यानी मुलीचे नाव न सांगता फिर्यादिशी हुज्जत घातली व फिर्यादीचे व्हीडीओ शुटिंग केली. आणी तुमची शुटींग दाखवतो नाही तर एक लाख द्या असे म्हटले असता व फिर्यादि हे तेथुन निघुन गेले त्यानंतर फिर्यादि याची प्रकृती खराब झाल्याने ते ईर्विन दवाखाना येथे उपचार केला त्यानंतर महालक्ष्मी पुजनाचा कार्यक्रम असल्याने आरोपी यांनी फिर्यादिस वांरवार फोन केले फिर्यादिने भितीच्या कारणाने फोन उचला नाही पुन्हा आरोपीने फिर्यादिस रात्रीला व्हाटअँप वर मँसेज केले व त्यामध्ये साँफ्ट काँपी पाठवली व एक मँसेज टाकला ज्ञानमाता शाळेच्या घटनेची वृत्तपत्रामध्ये आलेली बातमी पोस्टे केली हिच वेळ अशा प्रकारची कार्यवाही तुमच्यावर ही लवकरात लवकर होणार आहे अशी धमकी दिली. सदर आरोपी हा फिर्यादी यांना मुलीच्या तक्रारीची भिती दाखवुन बदनामी करण्याची धमकी दिली व एक लाख रुपयाची मागनी केली . अशा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | वलगाव अप.क्रं. 320/2023 कलम 294, 506(2), 34 IPC | ग्राम शिराळा. | घटना ता. वेळ- दि. 26/09/2023 चे 12/00 वा<br><br>दाखल दि.26/09/2023 चे 17/46वा. | फिर्यादी- रंजीत रामकृष्ण भोकसे वय 42वर्ष रा.मारवाडी पुरा शिराळा ता.जि.अमरावती मो.नं.9158689021 | आरोपी -1) राहुल रामा नरसुंकार वय 30वर्ष 2)चेतन रामा नरसुंकार वय 35वर्ष रा.शिराळा ता.जि. अमरावती 3) एक महिला | मी समक्ष पो.स्टे वलगाव ला येवुन जबानी रिपोर्ट देतो की,वरिल पत्यावर कुटुंबासह राहतो व शेती व्यवसाय करतो आज दि.26/09/2023 वा दरम्यान मी तिवारी यांचे यांचे शेत वाहीले होते.त्यामध्ये शेती चे काम करण्याकरीता गेलो काम संपवुन 12/00 वा दरम्यान घरी परत आलो .आंघोळ जेवन करुन घरात आराम करित होते.त्या दरम्यान माझे गावातील व तिवारीच्या शेताशेजारी शेत असणारे नामे राहुल रामा नरसुंकार वय 30वर्ष 2)चेतन रामा नरसुंकार वय 35वर्ष 3) आरोपी क्र. ३ असे तिघे ही माझे घरी आले व तुम्ही आमचे शेतातुन ट्रक्टर का नेला तुम्हाला तिकडुन रस्ता नाही या कारणावरुन माझे सोबत अश्लिल भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली जिवे मारण्याची धमकी देवुन निघुन गेले मी लगेच पो.स्टे ला रिपोर्ट देण्यास निघुन आलो माझ्या रिपोर्ट वर योग्य ती कारवाई होण्यास विनंती हाच माझा जबानी रिपोर्ट असुन माझ्या सागंण्याप्रमाणे लिहीला वाचुन पाहीला बरोबर आहे अशा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

- **अकस्मात मृत्यु :-**

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ८ |
| १ | पो ठाणे कोतवाली मर्ग क्र.३५/२३ कलम १७४ जा फौ | होली क्रॉस शाळेचे गेट समोर रोडवर अमरावती<br><br>घटना ता वेळ दि.२५.०९.२०२३ चे १७.३० वा<br><br>दाखल ता वेळ दि.२६.०९.२०२३ चे | एक महिला | आकाश प्रविण धुराटकर वय २७ वर्ष रा देवीनगर वडाळी अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, मी माझे पत्नी व मुलासोबत सराफा बाजार येथे माझी मो सा क्र.एम एच २७ सी ई ०५२६ ने जात असतांना हॉलीक्रॉस शाळेचे गेट समोर बारब्दे दवाखाना समोर माझा मुलगा हलल्यामुळे व आम्ही सर्व गाडीसह खाली रोडवर पडलो त्यामुळे मला व माझ्या मुलाला काही मार लागला नाही. परंतु माझी पत्नी मुलाला घेवुन डोक्यावर पडल्याने तिचे उजव्या डोळयाचे वर डोक्याला जबर मार लागल्याने मी माझे वडिलांना फोन करुन बोलाविले व पत्नीला पारश्री दवाखाना येथे नेवुन भरती केले. तेथे त्यांनी प्राथमिक उपचार करुन तिला डॉ.अलायन्स दवाखाना रुक्मीनी नगर अम येथे भरती केले तेथे २८ दिवस उपचार करुन तेथुन डॉ.प्रमोद गिरी निवरण हॉस्पीटल धंतोली नागपुर येथे उपचार केला परंतु तेथे उपचारात काही फरक न पडल्यने माझे पत्नीला दि.२५.०९.२३ रोजी सांयकाळी १८.०० वा डॉ.अविनाश चौधरी संकल्प हॉस्पीटल खापर्डे बगिचा अमरावती येथे आणुन भरती केले व आज दि.२६.०९.२०२३ रोजी सकाळी १०.०० वा चे सुमारास मृत्यु झाल्याचे सांगितले.करीता आज रोजी पोलीस स्टेशनला येवुन रिपोर्ट देत आहे.अशा डॉ.अविनाश चौधरी संकल्प हॉस्पीटल अम यांचे मरणाचा मेमो व फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. |